*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***NAVJYOT / Vol. XII / Issue - II*** ***ISSN 2277- 8063***

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे जातनिर्मूलनविषयक विचार व कार्य

**डॉ. रामचंद्र वसंत कुंभार,** सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, घटक महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा
kumbhar.ramchandra@gmail.com

---

**प्रस्तावना :**

भारतातील एक समाजक्रांतिकारक राज्यकर्ते म्हणून कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना (इ.स. १८७४ ते इ.स. १९२२) ओळखले जाते. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूरचा सर्वांगिण विकास झाला. कला, क्रिडा, शिक्षण, व्यवसाय, शेती, व्यापार, नाटयसंगीत अशा सर्वच क्षेत्रात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीत मोठा विकास घडून आला. कोल्हापूर राज्यातील बहुजन समाजाच्या सर्वांगिन उन्नतीसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राजकीय, आर्थिक, कायदेशीर सत्तेचा जाणीवपूर्वक वापर केला. बहुजन समाजाच्या सबलीकरणासाठी आर्थिक उपयायोजानांबरोबर त्यांनी कायदे करून त्याची कठोर अंमलबजावणी केली. महाराजांनी सन १९०२ मध्ये **'सरकारी नोकरीत आरक्षण देणारा कायदा'** केला. तर पुढे त्यांनी सन १९१७ मध्ये **'मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा'** केला. बहुजन समाजाच्या उन्नतीस जातीसंस्था मोठ्याप्रमाणात आडकाठी बनलेली आहे हे महाराजांनी बरोबर ओळखले होते. त्यामुळे जातीभेद निर्मुलनासाठी त्यांनी जाणीवपूर्वक पावले उचलली. प्रस्तुतच्या शोध निबंधामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जातनिर्मूलनविषयक विचार व कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

**कोल्हापूर संस्थांनी राज्य आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज :**

१८ व्या शतकाच्या सुरूवातीला मराठी स्वराज्याचे विभाजन होऊन सातारा व कोल्हापूर अशी दोन राज्ये निर्माण झाली. छत्रपती राजाराम महाराजांची पत्नी महाराणी ताराबाईने इ.स. १७१० मध्ये पन्हाळगडावर मराठ्यांच्या दुसऱ्या राज्याची म्हणजेच कोल्हापूर राज्याची स्थापना केली. स्वतंत्र कोल्हापूर राज्याची निर्मिती झाल्यानंतर कोल्हापूरच्या गादीवर अनेक सत्ताधीश येऊन गेले. कोल्हापूरच्या संभाजी महाराजांच्या (इ.स. १७१४ ते इ.स. १७६०) मृत्युनंतर त्यांच्या चतुर्थ पत्नी जिजाबाई यांनी शिवाजी दुसरा (इ.स. १७६२ ते इ.स. १८१२) यांच्या नावे इ.स. १७६० ते इ.स. १७७३ पर्यंत कोल्हापूर राज्याचा कारभार पाहिला. जिजाबाईंच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांची सहावी पत्नी दुर्गाबाईंनी राजप्रतिनिधी म्हणून काम पाहिले. दुसरे शिवाजी यांच्या कारकीर्दीत इ.स. १७८८ मध्ये कोल्हापूर राज्याची राजधानी पन्हाळगडावरून कोल्हापूरला आणण्यात आली.[१] दुसरे शिवाजी यांच्यानंतर शंभू महाराज (इ.स. १८१२ ते १८२१); छ. शहाजी दुसरे (इ.स. १८२१ ते १८३७); छ. शिवाजी तिसरे (इ.स. १८३७ ते १८६०); छ. राजाराम दुसरे (इ.स. १८६६ ते १८७०); चौथे शिवाजी महाराज (इ.स. १८७० ते १८७३) इ. राज्यकर्ते कोल्हापूरच्या गादीवर येऊन गेले. दरम्यान इ.स. १८२९ मध्ये कोल्हापूरचे राज्य ब्रिटीशांच्या सार्वभौम सत्तेखाली आले.[२] इ.स. १८२९ पासून भारत स्वतंत्र होईपर्यंत म्हणजे इ.स. १९४७ पर्यंत कोल्हापूरचे राज्य ब्रिटीशांच्या भारतातील साम्राज्यातील एक संस्थानी राज्य (Princely State) होते.

कोल्हापूरचे महाराज चौथे शिवाजी यांच्या मृत्यूनंतर इ.स. १८८४ मध्ये कागलकर घाटगे घराण्यातील यशवंतराव यांना दत्तक घेऊन त्यांना छत्रपती शाहू या नावाने कोल्हापूरच्या गादीवर बसविण्यात आले. यशवंतराव अर्थातच राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा जन्म इ. स. १८७४ मध्ये झाला. कोल्हापूर राज्यातील बहुजन समाजाच्या सर्वांगिन उन्नतीसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी विशेष प्रयत्न केले. दि. २६ जुलै, १९०२ रोजी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात मागासलेल्या जातींच्या लोकांसाठी ५०% जागा राखीव ठेवण्याचा कायदा केला.[३] पुढे बहुजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शाहू महाराजांनी दि. २१ सप्टेंबर, १९१७ रोजी कोल्हापूर राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा कायदा केला.[४]

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील हिंदू समाजातील जातीव्यवस्था :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळात भारतातील हिंदू समाजाप्रमाणे कोल्हापूर संस्थानी राज्यातील हिंदू समाजामध्ये जातीव्यवस्था केंद्रस्थानी होती. शाहुपूर्व काळात कोल्हापूर संस्थानी राज्यातील हिंदू समाज चातुर्वर्ण व्यवस्थेमध्ये विभागलेला होता. कोल्हापूर राज्यातील हिंदू समाजात ब्राहमण सर्वोच्च स्थानी होते तर त्याखालोखाल मराठा जातीचा क्रम लागत होता. त्यानंतर लिंगायत समाजाचे स्थान होते. लिंगायतांमध्ये वाणी व जंगम अशा पोटजाती होत्या. लिंगायत समाजानंतर गुरव व त्यानंतर बलुतेदार वर्गातील सुतार, कुंभार, धोबी, न्हावी हा एकाच श्रेणीतील समाज होता. पण त्यामध्ये श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद होता. सर्वात उच्च कुंभार, सुतार, न्हावी, धोबी असा क्रम लावला जात होता. हे एकाच श्रेणीतील असले तरी एकमेकात रोटी बेटी व्यवहार होत नव्हते. हिंदू समाजरचनेच्या सर्वात शेवटी चांभार, ढोर, रामोशी, महार, मांग, व्हलर या जातींचे स्थान होते.[५] राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील कोल्हापूर संस्थांनी राज्यातील हिंदू समाजामध्ये फारसा बदल झाला नव्हता. जातिव्यवस्थेमुळे समाजातील एक मोठा वर्ग मागासलेला होता.

१९०१ च्या सेन्सस रिपोर्टनुसार कोल्हापूर राज्यातील हिंदू समाज पाच वर्गामध्ये विभागला होता. पहिल्या वर्गास ब्राहमण, दुसऱ्या वर्गास क्षत्रिय असे संबोधले जात होते, तर तिसऱ्या व चौथ्या वर्गाचे नाव सर्वसाधारण वर्ग (General Classes) असे देण्यात आले होते. सर्वात शेवटचा व पाचवा वर्ग अस्पृश्य (Unclean Castes) म्हणून ओळखला जात असे.[६] सेन्ससनुसार जरी वरीलप्रमाणे कोल्हापूर संस्थांनी राज्यातील हिंदू समाजाची विभागणी केली असली तरी जातीव्यवस्था व अस्पृश्यता हीच राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील हिंदू समाजाची प्रमुख वैशिष्ट्ये होती.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे जातनिर्मूलनविषयक विचार :**

भारतातील पर्यायाने कोल्हापूर संस्थानी राज्यातील जन्माधीष्टीत जातिव्यवस्थेतील विशेषाधीकारामुळे एकीकडे उच्च स्थानावरील ब्राह्मण जातींची मोठी प्रगती झाली होती तर दुसरीकडे ब्राह्मणेतर जाती अतिशय मागासलेल्या राहिल्या. शिवाय या ब्राह्मणेतर जातींचा सामाजिक दर्जाही ढासळत गेला. या जातिव्यवस्थेचा सर्वात जास्त फटका अस्पृश्य जातींना बसला. थोडक्यात जातिव्यवस्थेमुळेच ब्राह्मणेतर जातींना सामाजिक गुलामगिरीत हजारो वर्षे खितपत पडावे लागले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जातीव्यवस्थेचे स्वरूप, त्याचे दुष्परिणाम आणि जातनिर्मुलनविषयक आपले विचार आपल्या भाषणातून मांडले. तसेच आपल्या विचारांना कृतीची जोड देऊन जातीभेद उच्चाटनासाठी मोठे प्रयत्न केले.

सुरुवातीच्या काळात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जातीभेदाचे समर्थक होते. याविषयी ते म्हणतात की, मी प्रथमतः जुन्या मताचा कट्टर अभिमानी होतो. जातीभेद कायम राहिला पाहिजे व पाळला पाहिजे असे माझे मत होते. अशा दुराभिमानाने इतरांची उन्नती होण्याच्या मार्गात मी अडथळा करतो याची जाणीव मला नसे. दुसऱ्या जातीच्या लोकांनी भरविलेल्या सभेत जाऊन अध्यक्षस्थान स्वीकारणे म्हणजे आपला धर्म बुडविणे असे मला वाटे.[७] पुढे महाराजांना जातीभेदाचे खरे स्वरूप लक्षात आले. त्यामुळे पुढील काळात त्यांनी जातिभेदाच्या उच्चाटनाबाबत आपले विचार मांडले.

1. **जातीसंस्थेबद्दल विचार :** जातीभेदामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव महाराजांना झाली होती. ते म्हणत जातीभेद पाळणे पाप आहे. देशाच्या उन्नतीच्या मार्गात हा अडथळा आहे. हिंदुस्थानात आहे अशा प्रकारचा जातीभेद जगातील कोणत्याच देशात अथवा दुसऱ्या ग्रहावर सापडणार नाही. हिंदुस्थानला जी गुलामगिरी आज हजारो वर्षे भोगावी लागत आहे, तिचे प्रधान कारण हा जातीभेद आहे.[८] जातीभेदाचे समर्थन करणाऱ्यांवर महाराज जोरदार टीका करतात. आपला व आपल्या पुढील संततीचा उच्च दर्जा कायम राहावा व इतरांवर सत्ता गाजविण्यास मिळावी अशी तीव्र इच्छा असल्यामुळेच उच्च दर्जाच्या लोकांकडून जातीभेद पाळणे व राखणे समाजाच्या उन्नतीस आवश्यक आहे असे सांगितले जाते. म्हणजेच जातीभेदाच्या समर्थनामागे वैयक्तिक स्वार्थ दडलेला आहे अशी टीका महाराज करतात. काही जण म्हणत असत की, जातीभेद असू द्या पण जातीद्वेष नको. याबद्दल महाराज म्हणतात की, असे मत मांडणाऱ्यांच्या अज्ञानाची मला कीव येते. कारण जातीभेदाचे कार्य म्हणजेच परिणाम

जातीद्वेष आहे. तेव्हा कार्य (जातीद्वेष) नाहीसे करण्यास कारणही (जातीभेद) काढून टाकले पाहिजे. जातीद्वेषाचे उच्चाटन करण्यासाठी जातिभेदच मोडला पाहिजे.[९]

2. **जातीसंस्थेच्या उच्चाटनाचे विचार :** राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जातीभेद व जातीसंस्थेचे फक्त दुष्परिणाम सांगितले नाहीत तर त्याच्या उच्चाटनाचे विविध मार्ग सांगितले आहेत.

1. जातीभेद नष्ट करण्याचा एक मार्ग म्हणजे **'कॉस्मोपॉलिटन तत्त्वाचा'** अवलंब करणे. शैक्षणिक संस्था, वसतिगृहे अशा संस्थातून सर्व जाती-धर्माच्या मुलांना एकत्र सहजीवन जगता आल्यास जातीभेद कमी होईल असे महराजांचे मत होते.

2. राजर्षी छत्रपती शाहू महाराज जातीभेद निर्मूलनाचा दुसरा व अत्यंत महत्त्वाचा मार्ग सांगतात तो म्हणजे उच्च वर्गाने आपल्या परंपरागत विशेषाधिकाराचा त्याग करणे होय. याबाबत महाराज म्हणतात की, जपानमधील सामुराई लोकांनी आपला जन्माने प्राप्त झालेला उच्च दर्जा सोडून दिला म्हणून जपानमध्ये ऐक्य होऊन त्या देशाची उन्नती झाली. त्याचप्रमाणे ब्राह्मणांनी जातीमत्सर सोडल्याशिवाय आपल्या लोकांची उन्नती होणार नाही.

3. ब्राह्मणांच्याप्रमाणे क्षत्रियांनीही जातीभेदाच्या उच्चाटनासाठी मागासलेल्या, मागे पडलेल्या जातींना विशेष सवलती दिल्या पाहिजेत असे महाराजांचे मत होते. याबाबत महाराज म्हणत की, सर्व जातींना हात देऊन त्यांना आपल्याबरोबर घेऊन सर्वांची स्थिती सुधारणे हे काम क्षत्रियांनी आवश्य केले पाहिजे.

4. जातिभेदाच्या मुळाशी ब्राह्मणांना जन्मसिद्ध धार्मिक बाबतीत असलेला श्रेष्ठपणा कारणीभूत आहे असे महाराजांना वाटत होते. ब्राह्मणांची धार्मिक नोकरशाही (रिलिजस ब्युरॉक्रसी) मोडल्याशिवाय आणि सर्वास धार्मिक बाबतीत सारखे हक्क मिळाल्याशिवाय कधीही देशोद्धार होणार नाही असे त्यांचे मत होते.[१०]

**जातनिर्मूलनविषयक कार्य :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जातभेद निर्मुलनासाठी फक्त विचार मांडले नाहीत तर आपल्या कृतीद्वारे जातीभेदाचे उच्चाटन करण्यासाठी उपाययोजनाही केल्या. महाराजांनी जातीभेद निर्मुलनासाठी केलेल्या उपययोजनांपैकी काही महत्त्वाच्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत.

1. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जातीभेद निर्मुलनासाठी **'कॉस्मोपॉलिटन तत्त्वाचा'** अवलंब केला. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता व जातीभेद पाळण्यास महाराजांनी कायद्याने बंदी घातली. २३ ऑगस्ट, १९१९ च्या गॅझेटमध्ये अस्पुश्यता निवारणाचे महाराजांचे तीन जाहीरनामे प्रसिद्ध झाले. पहिल्या जाहीरनाम्यानुसार महसूल, न्याय आदी खात्यात अस्पृश्यता पाळण्यास बंदी घालण्यात आली. दुसऱ्या जाहीरनाम्यानुसार विद्या खात्यात अस्पृश्यता न पाळण्याचा महराजांनी हुकुम दिला. तर तिसऱ्या जाहीरनाम्यानुसार धर्मार्थ दवाखान्यात अस्पृश्यता पाळण्यास मनाई करण्यात आली.[११.] महाराज एवढ्यावरच थांबले नाहीत तर पुढे ८ ऑक्टोबर, १९१९ रोजी महाराजांनी अध्यादेश काढून अस्पृश्य मुलांच्या स्वतंत्र शाळा बंद केल्या व सरकारी शाळांतून इतर मुलांप्रमाणे अस्पृश्य मुलांना प्रवेश द्यावा आणि सरकारी शाळातून शिवाशिव न पाळता सर्व जातींच्या व धर्मांच्या मुलांना एकत्र बसविण्याचा आदेश दिला. या अध्यादेशानुसार सरकारी शाळांप्रमाणे सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, स्टेट हौसेस, सरकारी अन्नछत्रे, नदीचे पाणवठे, सार्वजनिक विहिरी यथे अस्पृश्यता पाळण्यास बंदी घालण्यात आली.[१२.]

2. राजर्षी शाहू महाराजांनी क्षत्रिय म्हणून कर्तव्य बजावण्यात कोणतीच कसर ठेवली नाही. जातीभेद निर्मुलनासाठी मागास जातींना मदत करून त्यांना वरच्या स्थानावर आणण्यासाठी महाराजांनी अनेक उपाययोजना केल्या. दलित मुलांच्या शिक्षणासाठी अडीच हजार रुपयाची शिष्यवृत्ती महाराजांनी मंजूर केली, त्याचबरोबर अस्पृश्य मुलांचे उपनयन (मुंज) करून त्यांना वेदांची संथा दिली. पुढे महाराजांनी गुलामगिरीत अडकवून ठेवणारी महार वतनाची अमानुष पद्धत बंद केली. गंगाराम कांबळे नावाच्या अस्पृश्य व्यक्तीला 'सत्यसुधारक' नावाचे हॉटेल कढून दिले, शिवाय महाराज आपल्या सहकाऱ्यांसह गंगारामच्या हॉटेलमध्ये जाऊन चहा घेत असत.[१३] महाराजांनी मागास जातींच्या उत्थानासाठी सर्वात मोठे पाऊल उचलून दि. २६ जुलै, १९०२ रोजी कायदा करून मागासलेल्या जातींच्या लोकांना आपल्या संस्थानातील सरकारी नोकऱ्यांत ५० % जागा राखीव ठेवण्याचा जाहीरनामा घोषित केला.[१४]

3. जातीभेद नष्ट करण्यासाठी ब्राह्मणांची धार्मिक नोकरशाही (रिलिजस ब्युरॉक्रसी) मोडणे आवश्यक आहे असे महाराजांना वाटत होते. म्हणूनच त्यांनी जुलै, १९२० मध्ये शिवाजी वैदिक विद्यालयाची स्थापना केली. बहुजनांचे धार्मिक विधी भटजीविना अडू नयेत म्हणून या विद्यालयातून बहुजन समाजातील पुरोहित घडविणे आणि त्यांच्याकडून धार्मिक विधी करवून घेणे म्हणजेच ब्राह्मणांची धार्मिक मक्तेदारी नष्ट करणे हा उद्देश यामागे होता. [१५]

4. आंतरजातीय विवाहाशिवाय जातीसंस्थेचे समूळ उच्चाटन अशक्य आहे याची जाणीव महाराजांना झाली होती. म्हणूनच यांनी १९१८ मध्ये आंतरजातीय विवाह घडवून आणण्याची मोठी योजना आखली होती. या योजनेनुसार महाराजांनी धर्माधिकारी गुंडोपंत पिशवीकर यांना इंदूरच्या संस्थानात पाठविले होते. कोल्हापूर - इंदूर संस्थानांच्या दरम्यान १०० मराठा-धनगर आंतरजातीय विवाह घडवून आणण्याची महाराजांची योजना होती. महाराजांच्या या प्रयत्नांना यश येऊन पुढे उभय संस्थानांच्या दरम्यान २५ आंतरजातीय विवाह घडून आले. एवढेच नाही तर महाराजांनी आपल्या चुलत बहिणीचा विवाह इंदूरच्या यशवंतराव होळकर महाराजांशी जुळवून आणला होता. [१६]

5. राजर्षी शाहू महाराजांच्या काळात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास धर्मशात्राची संमती नसल्याने ते बेकायदेशीर ठरविले जात. याचा विवाह करणाऱ्यांना विशेषतः स्त्रीला मोठा त्रास सहन करावा लागे. त्यामुळे अशा विवाहांना कायद्याचे संरक्षण मिळणे आवश्यक होते. म्हणून महाराजांनी १२ जुलै, १९१९ रोजी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास व नोंदणी पद्धतीस मान्यता देणारा कायदा संमत केला.[१७]

**निष्कर्ष :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे जातनिर्मुलनविषयक विचार अतिशय प्रगल्भ आणि पुढील पिढीस मार्गदर्शक आहेत. जातीभेद नष्ट करण्यासाठी 'कॉस्मोपॉलिटिन तत्त्वाचा' अवलंब करणे, उच्च वर्गाने आपल्या परंपरागत विशेषाधिकाराचा त्याग करणे, मागे पडलेल्या जातींना विशेष सवलती देणे असे उपाय महाराजांनी सांगितले. जातीभेदास मुख्य कारण ब्राह्मणांची धार्मिक नोकरशाही (रिलिजस ब्युरॉक्रसी) आहे असे त्यांचे मत होते. हेच विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय व्यवस्थितपणे आपल्या **'भारतातील जाती : त्यांची संरचना, उत्पत्ती आणि विकास'** आणि **'जातीव्यवस्थेचे निर्मुलन'** या ग्रंथातून मांडले आहेत. बाबासाहेबांच्यामते हिंदू लोक जात पाळतात कारण ते अत्यंत धार्मिक आहेत. जातीचा धर्म शिकविणाऱ्या धर्मशास्त्रांमुळे हिंदू लोक जात पाळतात. त्यामुळे जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी हिंदू लोकांचा धर्मशास्त्रांच्या पवित्र्यावरील विश्वास ध्वस्त केला पाहिजे तरच ते आपले आचरण बदलतील. प्रत्येक स्त्री आणि पुरूषाला धर्मशास्त्रांच्या दास्यातून मुक्त करा, धर्मशास्त्रांवर आधारलेल्या विनाशकारी जाणिवांपासून त्यांची मने शुद्ध करा. मग तुम्ही त्याला अथवा तिला न सांगतासुद्धा ते आंतरजातीय सामूहिक भोजन आणि आंतरजातीय विवाह करतील.[१८]

महाराजांनी जातीभेद नष्ट करण्यासाठी फक्त विचार मांडले नाहीत तर त्या विचारांना कृतीची जोड दिली. जातीभेद निर्मुलनासाठी महाराजांनी सरकारी शाळांमध्ये अस्पृश्यांसह सर्व जाती-धर्माच्या मुलांना एकत्र बसून शिक्षण देण्याचा तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळण्याचे कायदे केले. याशिवाय त्यांनी मागासलेल्या जातींच्या लोकांना आपल्या संस्थानातील सरकारी नोकऱ्यांत ५० % जागा राखीव ठेवण्याचा कायदा तर केलाच, शिवाय ब्राह्मणांची धार्मिक नोकरशाही (रिलिजस ब्युरॉक्रसी) नष्ट करण्यासाठी पुरोहित शाळा काढल्या. महाराजांनी अतिशय विपरीत परिस्थितीतही आंतरजातीय विवाहाचा कायदा केला, तसेच आंतरजातीय विवाह घडवून आणले. महाराजांचे हे विचार व कार्य आजच्या राज्यकर्त्यांनाही खूप मार्गदर्शक आहेत.

**संदर्भ :**

१ भिडे ग. रं., देशपाडे पु. ल. (संपा.), कोल्हापूर दर्शन (श्रीमान मदनमोहन लोहिया अभिनंदन ग्रंथ), प्रथम आवृत्ती, इंटरनॅशनल पब्लिशिंग सर्व्हिस, डेक्कन जिमखाना पुणे, १९७१, पान नं. ३१.

२. कित्ता पान नं. ६०.

३. पाटील टी. एस., कोल्हापूर संस्थानातील सामाजिक, राजकीय चळवळींचा एक अभ्यास, अप्रकाशित एम. फिल. प्रबंधिका, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९९३, पान. नं. १२.

४. Dr. Sangave Vilas (Ed.), Rajarshi Shahu Chhatrapati Papers, Vol. – II (1914 – 1917 A. D.), Shahu Research Centre, Shivaji University, Kolhapur, Kolhapur, 1997, P. P. 359.

५. भोसले नंदकुमार, कोल्हापूर राज्यातील समाजिक – आर्थिक परिस्थिती (१९०१ ते १९६०), एम. फिल. प्रबंधिका, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९०, पान नं. ३१ व ३२.

६. Census of 1901Kolhapur and S.M.C. States, Kolhapur Government, Kolhapur, 1903, P.P.101 to102.

७. डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, द्वितीय आवृत्ती, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, २०१८, पान नं. ५४.

८. कित्ता पान नं. ५५.

९. कित्ता पान नं. ५५ व ५६.

१०. कित्ता पान नं. ५४ ते ५७.

११.डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे, द्वितीय आवृत्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली (पूर्व), २०१०, पान नं. ११९ ते १२३.

१२. कित्ता पान नं. १२७ व १२८.

१३. https://www.mpscacademy.com/2016/02/rajarshi-shahu-maharaj.html

१४. डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे उपरोक्त पान नं. ३३.

१५.https://maharashtratimes.com/maharashtra/kolhapur/kolhapur-shahu-vaidik-school/articleshow/57260079.cms

१६. डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे, द्वितीय आवृत्ती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०१८, पान नं. २०.

१७. कित्ता पान नं. ८४.

१८. डॉ. बी. आर. आंबेडकर, जातिव्यवस्थेचे निर्मूलन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१५, पान नं. ५४.